दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १९५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.१५ ऑक्टोबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## शिवसेना बावनकशी सोनं, ते जळतं तेव्हा उजळून निघतं, बाकीच्यांचं पितळ उघड पडणार : उद्धव ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

ठाण्यातील महाप्रबोधन यात्रेच्या उद्घाटनची सभा दणक्यात पार पाडून उद्धव ठाकरे यांच्या भेटीसाठी महिला शिवसैनिक मुंबईत दाखल झाल्या होत्या. उपनेत्या अनिता बिर्जे आणि ठाण्यातील महिला शिवसैनिकांनी आज मातोश्रीवर हजेरी लावली. उद्धव ठाकरे यांना महिला शिवसैनिकांनी आरपारच्या लढाईला तयार असल्याचा विश्वास दिला. आपली शिवसेना खरी आहे, सोनं जळतं त्यावेळी उजळून निघतं, बाकीच्यांच पितळं उघडं पडेल तो भाग वेगळा, असं उद्धव ठाकरे म्हणाले. यावेळी ठाण्याचे खासदार राजन विचारे, रश्मी ठाकरे देखील उपस्थित होत्या. सोनं जळत त्यावेळी उजळून निघतं, अशी प्रतिक्रिया उद्धव ठाकरे यांनी दिली आहे. आपली शिवसेना बावनकशी सोनं आहे, असं ठाकरे म्हणाले आहेत. त्यांचं पितळ उघडं पडणार असल्याचं त्यांनी म्हटंल. ठाण्यातील शिवसेना उपनेत्या अनिता बिर्जे यांच्यासह महिला शिवसैनिक मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांना भेटण्यासाठी दाखल झाल्या आहेत.

# माजी आमदार अवधूत तटकरेंचा भाजपात प्रवेश

## तटकरे कुटुंबातील वाद आणि तालुक्यात पुन्हा तीच कुजबुज!

**दै.रायगड नगरी । रोहा**

**श्रीवर्धन विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार अवधूत तटकरे यांनी शुक्रवारी भाजपात प्रवेश केला आहे. यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस, नंतर शिवसेना व आता भाजपात असा त्यांचा राजकिय प्रवास राहिला आहे. तटकरे कुटुंबातील वाद म्हणजे ठरवून केलेल्या उत्कृष्ट राजकारणाचा नमुना असल्याचे अनेकदा समोर आले असल्याने तालुक्यात पुन्हा वेगळी चर्चा आणि कुजबुज सुरू झाली आहे.**



शुक्रवार दि. १४ ऑक्टोबर रोजी मुंबईत वसंत स्मृती हॉल येथे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थित अवधूत तटकरे यांनी मोजक्या समर्थकांसोबत भाजपात प्रवेश केला. असून यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. रवींद चव्हाण ना. मंगल प्रभात लोढा तसेच आमदार तथा भाजप रायगड जिल्हा अध्यक्ष प्रशांत ठाकूर, आमदार रविंद्र पाटील अन्य उपस्थित होते. अवधुत तटकरे यांच्या प्रवाशाने रायगड मध्ये राष्ट्रवादी आणि शिवसेनेला जोरदार धक्का असल्याचे चित्र दिसत असले तरी रायगड मध्ये तटकरे कुटुंबियांतिल वाद म्हणजे ठरवून केलेले उत्कृष्ट राजकारण असल्याचे अनेकदा समोर आले आहे.

रायगड मध्ये तटकरे कुटुंबियांतिल वाद म्हणजे ही एक छान नाटक कंपनी बनली असल्याचे बोलले जाते. 'तू मारल्या सारखे कर मी रडल्या सारखे करतो' असे कौटुंबिक वाद असल्याचे मतदारांना तटकरे परिस्थितिनुरूप भासवत असतात, निवडणुकीला पुन्हा हे वाद अपसुक मिटतात, असे अनेकदा पाहण्यास मिळाले आहे.

### २०१४ पेण विधानसभा निवडणुकीत कुटुंबात कलह

२०१४ च्या पेण विधानसभा निवडणुकीत तटकरे कुटुंबात असेच कलह झाले होते, सुनील तटकरे यांचे थोरले बंधू आणि अवधुत तटकरे यांचे वडील अनिल तटकरे यांनी काँग्रेस –राष्ट्रवादी पक्षाची आघाडी असतानाही पेण मधून आघाडीच्या विरोधात उमेदवारी केली. या उमेदवारीमुळे झालेल्या मतविभागणीचा फटका बसून आघाडीचे उमेदवार माजीमंत्री रविंद्र पाटील यांना पराभव झाला होता. त्यावेळी कौटुंबिक वाद असल्याचे चित्र निर्माण करून तटकरेंनी दगा केल्याचा जाहीर आरोप रवी पाटील यांनी केला होता.

### जिल्हा परिषद निवडणुकीत पुन्हा एकत्र

जिल्हा परिषद निवडणुकीत एकत्र येणे गरजेचे होते, त्यासाठी डिसेंबर २०१६ मध्ये शिवसेनेच्या प्रचाराचा शुभारंभ करणारे आमदार अवधूत तटकरे एप्रिल २०१७ मध्ये जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी पक्षाच्या अदिती तटकरे यांचे उमेदवारी अर्ज भरण्यासाठी सर्वात पुढे होते. परिणामी तटकरे कुटुंबियांतिल हा तथाकथित कलह आणि बेबनाव जनते पासून लपून राहिलेला नाही. कौटुंबिक वाद असल्याचे मतदारांना तटकरे परिस्थितिनुरूप भासवत असतात निवडणुकीत गरजे प्रमाणे हे वाद पुन्हा होतात, तसेच ते आपसुक मिटतात ही, असे अनेकदा समोर आले आहे.

### नगर पालिका निवडणुकीत वाद

रोहा नगर परिषदेच्या २०१६ मधिल निवडणुकित विरोधातील मतांची विभागनी होणे तटकरेंसाठी आवश्यक होते. तेव्हा ही तटकरे कुटुंबात असेच वाद झाले. सुनिल तटकरे यांचे पुतणे आणि अवधुत तटकरे यांचे छोटे बंधु संदीप तटकरे यांनी शिवसेनेत प्रवेश करीत सेना पुरस्कृत उमेदवारी केली. तर आमदार अवधूत तटकरे यांनी शिवसेनेच्या प्रचाराचा श्रीफळ वाढवित शुभारंभ केला होता. या निवडणुकीत मतविभागणीचा फटका बसून नगराध्यक्ष पदासाठी विरोधात असलेले अपक्ष उमेदवार समीर शेडगे यांचा केवळ ६ मतांनी पराभव झाला. तटकरेंनी केलेले तात्पुरती स्वरूपाचे पक्षांतर यशस्वी होत राष्ट्रवादी पक्षाचे उमेदवार ६ मतांच्या फरकाने निवडून आले. सदर निवडणुकीनंतर संदीप तटकरे पुन्हा स्वगृही परतले

---

**पनवेल काँग्रेस भवनात सर्वपक्षीय नेतेमंडळींच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप**

## सर्व लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था व तरुणांनी विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे : अभिजीत पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आजच्या आधुनिक युगात अनेक शिक्षणपद्धती उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान अवगत करण्यासाठी उच्चशिक्षण घेणे गरजेचे आहे. सर्व लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था व तरुणांनी विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. समाजव्यवस्था घडवण्यासाठी तरुण पिढीचा सहभाग वाढावा, असे प्रतिपादन पनवेल शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी केले. तर शालेय विद्यार्थी हे देशाची भावी पिढी आहेत. त्यांच्यावर संस्कार करण्यासाठी, आदर्श निर्माण करण्यासाठी आज अनेकजण पुढे येत आहेत याचा आनंद वाटतोय. हे करण्यासाठी तरुणांचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे असे प्रतिपादन काँग्रेसचे जेष्ठ नेते डॉ. भक्तीकुमार दवे यांनी केले. ते पनवेल शहर काँग्रेस भवन येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाच्या कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते.



पनवेल जिल्हा युवक काँग्रेसचे नेते ऍड.प्रितेश साहू यांच्या वाढदिवसानिमित्त आज (शुक्रवार दि.१४ ऑक्टोबर) पनवेल महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक १ लोकनेते दि बा पाटील विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी पनवेल शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अभिजीत पाटील, काँग्रेसचे जेष्ठ नेते डॉ.भक्तीकुमार दवे, पनवेल मनपाचे माजी विरोधीपक्षनेते प्रितम म्हात्रे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस सुदाम पाटील, पनवेल तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष हेमराज म्हात्रे, महिला जिल्हा अध्यक्षा निर्मला म्हात्रे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या पनवेल जिल्हा कार्याध्यक्षा शशिकला सिंग, प्रताप गावंड, भाई म्हात्रे, पनवेल युवक काँग्रेस अध्यक्ष राकेश जाधव, माजी पं स सभापती वसंत काठावले, माजी नगरसेविका मंजुळा कातकरी यांच्यासह सर्वपक्षीय नेतेमंडळी, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षकवृंद व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## होळीच्या माळावरील शिवाजी महाराजांच्या मूर्तीवर छत्र बसविण्यास मान्यता : संभाजी राजे छत्रपती

**दै.रायगड नगरी । महाड**

किल्ले रायगडवरील होळीच्या माळावर असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंहासनाधिष्ठीत मूर्तीवर छत्र बसविण्यास पुरातत्व विभागाने परवानगी दिली आहे. या मुर्तीवर ऐतिहासिक स्वरुपाचे छत्र बसविण्याचे काम लवकरच हाती घेण्यात येईल, अशी माहिती रायगड विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती यांनी दिली.

२०२३ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३४८ वर्षे पूर्ण होत आहेत. या पार्श्वभूमीवर ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहोळ्याची पूर्वतयारी सुरु करण्यात यावी, त्याच प्रमाणे प्राधिकरणाच्या माध्यमातून गडावर होत असलेल्या विविध कामांना गती मिळावी यासाठी श्री.संभाजीराजे छत्रपती यांनी भारतीय पुरातत्व विभागाचे अतिरिक्त संचालक आलोक त्रिपाठी यांची गुरुवारी दिल्लीत भेट घेवून, त्यांच्याशी चर्चा केली. त्यावेळेस छत्र बसविण्याच्या मागणीला परवानगी देण्यात आली. या परिसराचे सुशोभिकरण पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत करण्यात येणार आहे. संवर्धन आणि किल्ले रायगडवरील उत्खननासाठी रायगड विकास प्राधिकरणाने पुरातत्व विभागाला निधी दिला आहे.या निधीतून केवळ २० टक्केच काम झाले असून उर्वरित उत्खनन आणि संवर्धनाचे काम तात्काळ सुरु करण्याची सूचना आपण केल्याचेही श्री.संभाजीराजे राजे यांनी सांगितले.

रायगड प्राधिकरणाच्या माध्यमातून मटेरियल रोपवे आणि प्रवासी रोप वे सुरु करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात यावी, पुरातत्व विभागातर्फे आकारण्यात येणारे प्रवेश शुल्क रद्द करण्यात यावे. त्याचप्रमाणे राजसदरेवरील क्राँक्रीटचा जो थर पुरातत्व विभागाने काढला आहे. त्या ठिकाणी कामाला प्रारंभ करण्यात यावा, सिंहासन चौथर्यावरील काँक्रीटचा थर काढून, त्याला ऐतिहासिक स्वरुप द्यावे अशा सूचनाही आपण केल्याचे श्री.संभाजीराजे छत्रपती यांनी सांगितले.



## संस्कृतीचे महत्व वाढावे यासाठी किल्ले स्पर्धेचे आयोजन : परेश ठाकूर



**दै.रायगड नगरी । पनवेल**

किल्ले बनवण्याच्या कलेला महत्व यावे आणि आपल्या संस्कृतीचे महत्व वाढावे, यासाठी हि स्पर्धा महत्वाची आहे. असे प्रतिपादन पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी गुरुवारी येथे केले. भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल शहरच्या वतीने दीपावली निमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही किल्ले स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यापार्श्वभुमीवर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा येथे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते या स्पर्धेच्या पोस्टरचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी परेश ठाकूर यांनी श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी किल्ले स्पर्धेच्या पोस्टरच्या उद्घाटनावेळी पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेवक अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, राजश्री वावेकर, रुचीता लोंढे, पनवेल शहर सरचिटणीस अमरीश मोकल, खजिनदार संजय जैन, युवानेते केदार भगत, भाजप युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सचिव चिन्मय समेळ, विवेक होन, उदित नाईक, भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष रोहित जगताप, युवा मोर्चा उपाध्यक्ष अभिषेक भोपी, रोहित कोळी, अक्षय सिंग, देवांशु प्रभाळे, नुतन पाटील, नितेश घुगे, अर्जुन भगत, अनिकेत भोईर, श्रावण घोसाळकर, विशांत सपालीया, सिद्धार्थ मोहिते, शुभम कांबळे, अजित सिंग, सिद्धेश खानावकर, रवी संदेपॉल, करण सोनवणे, रोहन माने यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

## कार्यकर्ता हा परिपक्व आणि पक्षाशी एकनिष्ठ असावा : आ.जयंत पाटील

**दै.रायगड नगरी । उरण**

**उरण तालुक्याला खरी नेतृत्वाची गरज आहे. आज शेकापच्या तालुका चिटणीस पदी सर्वानुमते विकास नाईक यांची निवड ही शेकापक्षाच्या कार्यकर्त्यांना विश्वास घेऊ करण्यात येत आहे. शेकापक्षाने अनेकांना मोठे केले. परंतु पक्षाशी एकनिष्ठ राहिले नाहीत. कार्यकर्ता हा परिपक्व आणि पक्षाशी एकनिष्ठ पाहिजे. वाजेकरशेठ ची ही भूमी आहे. या तालुक्यातील शेकापक्षाचे आमदार हे उरणची शान होती. त्यामुळे या तालुक्याचे नेतृत्व हे पुन्हा शेकापक्षाचा कार्यकर्ता म्हणून विकास नाईक च्या रुपाने करणार आहे. असे प्रतिपादन आमदार जयंत भाई पाटील यांनी व्यक्त केले.**



उरण तालुक्यातील शेकाप पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या मध्ये समन्वय साधण्यासाठी उरण जेएनपीए टाऊनशिप येथील मल्टीप्लेक्स हॉल मध्ये शुक्रवारी ( दि१४) सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शेकापच्या उरण तालुका चिटणीस पदी विकास नाईक यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या सभेला संबोधित करताना आमदार जयंत पाटील यांनी पुढे सांगितले की ही सभा तालुका चिटणीस निवडण्याची आहे. आपल्याला प्रभारी कामगार संघटना निवडण्याची गरज आहे. आज जे कामगारांचे नेतृत्व करतात ते भांडवलदारांचे मिलींदे होतात. या तालुक्यात शेकापक्षाची ताकद वाढविण्यासाठी कार्यकर्त्यांनी तळागळात काम केले पाहिजे. आज देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तरुणांना आश्वासन देण्याचे काम केले. परंतु येथील तरुणांना रोजगार मिळवून देण्याचे काम शेकाप करत असून यापुढे ही करणार आहे, आज वायु विद्युत केंद्र उरण येथील दुर्घटनेतील कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी उरणचे आमदार जात नाहीत हे दुर्दैव आहे.

पण या कामगारांच्या वारसांना न्याय मिळवून देण्यासाठी शेकाप कटिबद्ध असून या संदर्भात विधिमंडळात आवाज उठविणार आहे.तरी शेकापचा तरुण कार्यकर्ता दुसऱ्या पक्षात जात असेल तर ते योग्य नाही. त्यासाठी प्रथमतः प्रत्येकांनी तरुणांना सांभाळून ठेवणे गरजेचे आहे. शेकापक्षाचे आमदार हे उरणची शान होती. त्यामुळे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी या तालुक्यात भांडत न बसता उरणच्या जनतेचा आदर करा कारण आज ही उरण आपलंच आहे. त्यामुळे उरणच वैभव पुन्हा फुलविण्यासाठी व आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सर्वांनी जोमाने कामाला सुरुवात करा.असे आवाहन ही शेवटी आमदार जयंत पाटील यांनी उपस्थितांना केले.

…/२

उरण तालुका हा वाजेकर शेठ यांचा लढवय्यांचा तालुका आहे. लोकनेते दि.बा.पाटलांच्या नेतृत्वा खाली अनेक लढे उभारले अशा लढ्याला खरी साथ ही शेकापक्षाच्या तळागाळातील कार्यकर्त्यांनी दिली. आज वायु विद्युत केंद्रात दुर्दैवी घटना घडली त्या घटनेतील कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी उरणचे आमदार आले नाहीत. पण कामगार नेते भुषण पाटील व त्यांचे सहकारी आले. येथील प्रकल्पग्रस्त, शेतकरी यांना रोजगार देण्याचे काम शेकापक्षाने केले. तरी एकमेकांची उणी धुणी न काढता भविष्यात या परिसरातील तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी पुन्हा एकदा एकसंघ होऊ या, त्याची सुरुवात ही उरण तालुक्यात नव्याने उदयास येत असलेल्या शेकापक्षाच्या कार्यालयातून करु.

**आ.बाळाराम पाटील**

# एसटीच्या मरणकळा

राज्य परिवहन महामंडळ, म्हणजेच एसटीच्या मागे लागलेले आर्थिक अरिष्टाचे शुक्लकाष्ठ संपायला तयार नाही. सरकार बदलले म्हणजे एसटीचे भवितव्यही बदलेल अशी आस लावून बसलेल्या काही कर्मचाऱ्यांचा मात्र चांगलाच हिरमोड झाला. पगार वेळेवर मिळणे तर दुरापास्त झालेच, पण इंधनासाठीही पैसे शिल्लक नसल्याने पुणे, चंद्रपूर विभागातील एसटीच्या फेऱ्याही रद्द करण्याची नामुष्की ओढवली. एकीकडे संपानंतरच्या पगाराच्या सरकारी हमीला विद्यमान सरकारने सुरुवातीलाच हरताळ फासला असताना, दुसरीकडे बडतर्फ कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्याचाही निर्णय घेतला. असंख्य समस्यांनी बेजार झालेली ही महाराष्ट्राची जीवनवाहिनी वयाची पंचाहत्तरी पार करताना पुढे टिकणार का, हा संभ्रम घेऊनच मार्गक्रमण करीत आहे. वास्तविक, गेल्या काही वर्षांपासूनच आर्थिक संकटांमुळे ती रस्त्यावरून घसरली होती. राज्य शासनानेही हवे तसे लक्ष दिले नाही. प्रवाशांवर सवलतींची मेहेरनजर करताना त्याची भरपाई करण्यास मात्र सगळ्याच सरकारांनी कानाडोळा केला. साहजिकच घटते प्रवासी, वाढते पगार, आजारी वाहने, खरेदीतील गैरव्यवहार अशी संकटांची मालिकाच चालू झाली. आठ हजार कोटींहून अधिक रुपयांचा महसूल मिळविणाऱ्या एसटीला लाखभर कर्मचाऱ्यांच्या वेतनावर ५३, तर इंधनावर ३५ टक्के खर्च करावा लागतो. प्रवासी करापोटी कोट्यवधींचा भरणा नियमित शासनाकडे जमा करावाच लागतो. परिणामी भांडवली खर्चासाठी पैसेच उरत नाहीत. मध्यंतरी हात दाखवा अन् एसटी थांबवा यासारखे काही उपक्रम तसेच दस्तुरखुद्द काही कर्मचाऱ्यांनीच अधिक महसूलवाढीचे उद्दिष्ट ठेवून केलेले काम, करोनाकाळात मालवाहतुकीचा पर्याय अशा काही चांगल्या उपायांची निश्चितच मदत झाली; तथापि, हे दात कोरून पोट भरण्यासारखे झाले. खासगी वाहतुकीच्या जीवघेण्या स्पर्धेत सरकारी एसटी जगायला हवी, हा विचार प्राधान्याने केला गेलाच नाही. खंगलेल्या एसटीपुढे खासगी कंपन्यांच्या सर्व सुविधायुक्त अशा स्मार्ट गाड्या प्रवाशांच्या पसंतीस न पडत्या तरच नवल होते. काटकसरीला सुरुवातीपासूनच फाटा दिलेल्या या आस्थापनेत खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा शहाणपणा कोणालाच सुचला नाही. एशियाड, शिवशाही, शिवनेरी अशा एकसे बढकर एक सुविधायुक्त गाड्यांची सेवा सुरू करुन खासगी ट्रॅव्हल्सशी स्पर्धा करण्याचा प्रयत्न केला गेला खरा; परंतु त्यासाठी खासगी कंपन्यांच्या गाड्या भाडेतत्त्वावर घेतल्याने हा सारा आतबट्ट्याचा व्यवहार ठरला. शासनाचे काम म्हटल्यावर ते सरळरेषेत धड होणारच नव्हते. वेड्यावाकड्या वळणांनी अशा अनेक चांगल्या योजना, उपक्रमांचा बोजवारा उडाला. करोना संकट हे जणू अपार ओझ्याखाली दबलेल्या एसटीवर अखेरची काडी पडल्यासारखे झाले. जवळपास दीड ते दोन वर्षे एसटीची चाके ठप्प होती. ही रुतलेली चाके वर काढणे शक्यच झाले नाही. अशातच संपाचे हत्यार उपसले गेले. कर्मचाऱ्यांच्या २८ संघटना हाही एका वेगळ्या अर्थाने अतिरेकच होता. हा आता इतिहास झाला; पण आपल्या हक्कांसाठी लढणाऱ्या या संघटनांनी एसटीच्या हितालाही अग्रस्थानी ठेवले असते तर कदाचित अडचणी कमी झाल्या असत्या. २७ संघटनांचा विरोध असतानाही संप मात्र दीर्घकाळ एकजुटीने चालला. कर्मचाऱ्यांची ही एकी अनेक संकटातही मजबूत राहिली. राजकारण्यांनी संप हायजॅक करण्याचा प्रयत्न केला. नेते बदलले. काही नेते नंतर चक्क परागंदा झाले. सरकार अडचणीत आहे म्हणून मग विरोधी पक्षांनीही तापलेल्या तव्यावर पोळी भाजून घेतली. न्यायालयालाही वारंवार हस्तक्षेप करावा लागला. अखेर सरकारने मासिक पगाराची हमी घेऊन पगारवाढीचा निर्णय घेतल्यानंतर संप मिटला. शासकीय सेवेत सामावून घेण्याची मागणी काही मान्य होऊ शकली नाही. तथापि, तेव्हा या मागणीला हवा देणारेच आज सत्तेवर असताना, सगळेच निवांत आहेत. ही शांतता भयसूचक आहे. न्यायालयाला हमी देऊनही नव्या सरकारने दर महिन्याला द्यावयाच्या निधीत घसघशीत कपात करायला सुरुवात केली आणि रस्त्यावर येऊ पाहणारी एसटी पुन्हा घसरणीला लागली. सप्टेंबरच्या पगाराचे वांधे झाले. इंधनाची समस्या भेडसायला लागली. खासगी पेट्रोलपंप मालकांनी लक्षावधीची देणी थकल्याने डिझेल देणे बंद केले. पुन्हा ओरड सुरू झाली. अखेर शासनाने निधीची तरतूद करून संकटावर प्रासंगिक मात केली असली तरी दर महिन्यालाच आता या प्रश्नाला तोंड द्यावे लागणार. कर्मचाऱ्यांच्या पगारासाठीही तीनशे कोटी रुपये सरकारने मंजूर केले, तसेच निलंबित व बडतर्फ कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत घेऊन किमान त्या आघाडीवर शांतता राहील, याची काळजी घेतली गेली. मात्र, भविष्यात त्यांनाच शासकीय सेवेत सामावून घेण्याचा मुद्दा पुढे येईल तेव्हा सरकारची खरी अर्थाने कसोटी लागेल. एसटी वाचवायची असेलच तर दीर्घकालीन हितकारक निर्णय घेण्याचे धाडस दाखवावे लागेल. पगारामुळे कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड होईल हा, रास्त विचार झाला. आता एसटीचे दिवाळं निघणार नाही, हेही तेवढ्याच तत्परतेने पाहायला हवं.

# चारही ग्रामपंचायतींमध्ये विजयश्री खेचून आणू : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

केंद्र आणि राज्य सरकार आपले आहे आणि विकासाची दूरदृष्टी आमदार महेश बालदी यांच्यामध्येही आहे. त्यामुळे सुज्ञ मतदारांनी परिवर्तन आघाडीच्या मागे ठामपणे उभे राहावे. म्हणजे आपण चौकसह परिसरातील चारही ग्रामपंचायतींमध्ये विजयश्री खेचून आणू, असा निर्धार भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी व्यक्त केला. ते चौक येथील भव्य जाहीर सभेत बोलत होते.



भाजप, बाळासाहेबांची शिवसेना, मनसे व रिपाइं (आठवले गट) परिवर्तन आघाडीच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ पोतदार सभागृहात जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला आमदार महेश बालदी, माजी आमदार देवेंद्र साटम, शिवसेना उपनेते विजय चौगुले, भाजप नेते विनोद साबळे, खालापूर तालुकाध्यक्ष रामदास ठोंबरे, लक्ष्मण पवार, मनसेचे आशिष चौधरी, गोपीनाथ जाधव, आरपीआयचे महेंद्र धनगावकर, प्रमोद महाडिक, पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका विद्या गायकवाड, चौक ग्रामपंचायतीच्या थेट सरपंचपदाच्या उमेदवार गायत्री गणेश कदम व सदस्य पदाचे उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी आमदार महेश बालदी यांनी येथील जनतेला सहा महिन्यांत वीज, पाणी, रस्ता देऊ, असे सांगितले. ते पुढे म्हणाले की, उरण विधानसभा मतदारसंघासाठी १६० कोटी रुपये मंजूर केले आहेत.

इरसाळ वाडीतील वेदना मला जाणवल्या आहेत. मोरबे धरणा खालील प्रश्नही सोडवू. चौकमध्ये प्रशस्त सभामंडप, मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला जाईल. गाव सुजलाम सुफलाम करू. माजी आमदार देवेंद्र साटम यांनी चारही ग्रामपंचायतींमध्ये भाजपचे थेट सरपंचपदाचे उमेदवार निवडून येतील, असा विश्वास व्यक्त केला. शिवसेनेचे उपनेते विजय चौगुले म्हणाले की, सध्या राज्यात जनतेचे सरकार आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री वेळ देणारे आहेत. आता आपले प्रशांतदादा ठाकूर मंत्री व्हावेत. भाजप तालुकाध्यक्ष रामदास ठोंबरे यांनी सांगितले की, आमदार महेश बालदी यांनी चौक परिसरात विकासनिधी नऊ कोटी, तलाव सुशोभीकरण ४. ५ कोटी, प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृहाचा पुनर्विकास करण्याचा इरादा केला आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीमध्ये सत्ता देऊन विकासासाठी आमदार महेश बालदी यांचे बळ वाढवा.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते आहे की, माझे अशिल श्री.रंजन शाम शेट्टी आणि सौ.दिप्ती रंजन शेट्टी यांचा फ्लॅट नं.एफ/३०२, ३ रा मजला, बालाजी कलश फेज १, को.ऑ. हौ.सो.लि., आदईगाव, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६. या फ्लॅटचे मालक आहेत. सदर फ्लॅटचे मुळ दस्त नं.११४६०/२०१५ करारनामा नोंदणीकृत पहिले मुळ दस्त हरविले आहे.

मे.तिरुपती बालाजी बिल्डर्स अ‍ॅण्ड डेव्हलपर्स प्रा.लि.तर्फे डायरेक्टर संदीप काळुराम पाटील आणि श्री.रंजन शाम शेट्टी व सौ. दिप्ती रंजन शेट्टी यांच्यामध्ये करण्यात आलेला दि.११/०९/२०१५ रोजी सब रजिस्टार पनवेल ४ डॉक्युमेंट नं.११४६०/२०१५ तो दस्त दि.१५/०९/२०२० रोजी नवीन पनवेल ते आदईगाव परिसरात हरविले / गहाळ झालेले त्या संदर्भात खांदेश्वर पोलीस स्टेशनमध्ये दि.२९/१०/२०२० रोजी प्रॉपर्टी मिसिंग नोंदणी क्रं.११२४/२०२० प्रमाणे वरील कागदपत्राची नोंद केलेली आहे. सदर कागदपत्र कोणाला सापडले तर त्याचा कोणाकडून गैरवापर होवू नये. माझे अशिल असे जाहीर करतात की, जर कोणाकडून सदर कागदपत्राचा गैरवापर झाला तर नुकसान भरपाईस माझे अशिल कायदेशीर जबाबदार राहणार नाहीत. माझे अशिल असे जाहीर करतात की सदर दस्ताचे बाबतीत कोणाचे योग्य शिर्षक आणि हित किंवा दावा असेल तर त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत देण्यात यावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरले जाईल.

दि.१४/१०/२०२२

**सही/-**
**अ‍ॅड.संध्या लोखंडे**
**वकील उच्च न्यायालय**
**शॉप नं.४५, महालक्ष्मी मॉल, से.३५,**
**कामोठे, नवी मुंबई ४१०२०९**
**मो.नं.७९६७९७३५९२**



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत त्यांचे विद्यमान मालक १) दिपक गुरुनाथ पाटील, २) गणेश गुरुनाथ पाटील, ३) नलिनी मनश्याम गावंड, ४) दया सचिन पाटील, ५) कलावती धर्मा गावंड, ६) गुलाब मनोहर म्हात्रे यांच्याकडून आमचे अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार ठरविला आहे. त्या व्यवहाराची जाहीर नोटीस देण्याबाबत विद्यमान मालकांनी संमती दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पिरकोन, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | मौजे | सर्व्हे नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | पिरकोन | २२६/१ | ०.३३.०० पो.ख. ०.०२.०० | ३.८७ |

वर वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व ताबे कब्जाची आहे. सदरील मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकाने दिल्यावरुन आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स मेहर, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क, हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधितांच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आणून द्यावी. या प्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व नंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

उरण
दिनांक : १५/१०/२०२२

**सही/-**
**अ‍ॅड.धिरज लहू डाकी**
**रा.बोरखार, पो.दिघोडे,**
**ता.उरण, जि.रायगड**
**मो.नं.८१०८५४९१८३**


# खा.सुनील तटकरे यांच्या आदेशाचे अंमलबजावणीला सुरूवात

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

दिघी पुणे राष्ट्रिय मार्गावरील माणगाव कडून म्हसळा कडे जाताना म्हसळा तालुक्यातील ५ किमी अंतरावर घोणसे घाटातील शेवटच्या तीव्र उतार वळणावर मोठ्या प्रमाणात अपघाती घटना घडत आहेत. अपघात रोखण्यासाठी काही तरी ठोस उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी म्हसळयातील नागरिकांनी खासदार सुनिल तटकरे यांच्या कडे केली असता खासदार तटकरे यांनी दिनांक १२ ऑक्टोंबर २०२२ रोजी रायगड जिल्हा अधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांचे समावेत राजस्व सभगृहात म्हसळा, श्रीवर्धन महसुल विभाग, एम.एस.आर.डी.सी., बांधकाम विभाग एजंसी, आर.टी.ओ.पेण आणि स्थानिक पत्रकार, लोकप्रतिनिधी यांचे समावेत तातडीची बैठक घेतली होती याच बैठकीत खासदार तटकरे यांनी घोणसे घाट अपघात स्थळाची तसेच म्हसळा शहर पर्यायी मार्ग व्यवस्था दुरूस्ती व सुधारणा कामी दिनांक १४ ऑक्टोंबर रोजी प्रत्यक्ष पहानी करून ठोस उपाययोजना करण्यात याव्यात असे आदेश वजा सुचना दिल्या होत्या.

त्यांनी केलेल्या आदेशाची वरील सर्व शासकिय, निमशासकीय यंत्रणेने दखल घेऊन घोणसे घाट अपघाती स्थळी उपविभागीय अधिकारी अमित शेडगे, एम.एस.आर.डी.सी.चे अधिकारी एस.एस.गावीत,बांधकाम विभाग एजंसी अधिकारी नंदेश नागोल, पोलिस उप विभागीय अधिकारी प्रशांत स्वामी, ट्रॅफिकचे पी.आय.सुवर्णा पत्की, आर.टी.ओ.अधिकारी महेश देवकाते, मुख्याधिकारी मनोज उकिर्डे, पोलिस अधिकारी संदीपान सोनवणे, बांधकाम कार्यकारी अभियंता एम.आर.नामदे, सार्वजनिक बांधकाम उप अभियंता पी.एस.राऊत, निवसी नायब तहसिलदार गणेश तेलंगे, रस्ता विकासक जे.एम.म्हात्रे कं.अभियंता जाधव, प्रसाद बडे, तालुका लोकप्रतिनिधी महादेव पाटील, समीर बनकर, सरपंच रेश्मा काणसे, नगराध्यक्ष असहल कादीरी, उपनगराध्यक्ष सुनिल शेडगे, नगर सेवक संजय कर्णिक, नासीर मिठागरे, मुन्ना पानसरे, संजय दिवेकर, माजी सरपंच राजु लाड, शाहिद उकये, मुद्दिक इनामदार, सचिन महामुनकर, अमित महामुनकर, निलेश मांदाडकर स्थानीक रहिवासी यांनी संयुक्तिकपणे घोणसे घाट अपघात स्थळाची तसेच म्हसळा शहर पर्यायी मार्ग व्यवस्था दुरूस्ती व सुधारणा कामी पाहणी केली. या वेळी उपस्थित अभ्यासु मान्यवरांनी घाट अपघात रोखण्यासाठी मोठे सूचना फलक, रमलर, ब्रिंकलर, रीप्लेक्ट्टर, संरक्षण भिंत बांधकाम व त्याला टायर बांधणे, करो कमी करणे, झाडी आणि उंच डोंगर छाटणे आदी उपाय योजना सुचवल्या असता या सर्व बाबींची अंमलबजावणी काही दिवसांतच करण्यात येणार असल्याचे उप विभागीय अधिकारी अमित शेडगे यांनी माहिती देताना सांगितले. त्याच बरोबर खासदार सुनिल तटकरे यांनी येत्या आठ दिवसांत घोणसे घाट मार्ग दुरूस्ती कामी तातडीने उपाययोजना कराव्याचे आदेश दिले असता घटनास्थळी अवघ्या दोन दिवसांत रस्ता दुरुतीचे कामाचे अंमलबजावणीला सुरूवात झाली असल्याचे दिसून आले.



# अज्ञात चोरट्याने केला ड्रायफ्रुटवर हात साफ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ऐन सणासुदिच्या काळात अज्ञात चोरट्याने केला ड्रायफ्रुटवर हात साफ केल्याने व्यापारी वर्गामध्ये भीती युक्त वातावरण पसरले आहे.

तालुक्यातील कोयना वेळे येथील श्रीजी सुपरमार्केट दुकानामध्ये अज्ञात चोरट्याने बंद दुकानाचे शटर उचकटून आतमधील १३ हजार रुपये रोख, एक मोबाइल व ,काजू, बदाम, पिस्ता असा मुद्देमाल चोरून नेला आहे. याप्रकरणी दुकान मालक प्रकाश पटेल यांनी तळोजा पोलीस स्टेशनमध्ये घरफोडीची तक्रार दिली आहे.


## पनवेल महानगरपालिका
### वैद्यकीय आरोग्य विभाग

**कार्यालय : देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल-४१०२०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२-२७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२-२७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

जा.क्र./पमपा/वै.आ.वि/१९९५/सन २०२२-२३ दिनांक : १४/१०/२०२२

### शुद्धीपत्रक

निविदा क्रं.MHD/१३/२०२१

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांच्या कोव्हीड चाचण्या (RTPCR) भविष्यात त्यानुषंगे होणाऱ्या इतर चाचण्या करणेकामी प्रति चाचणी (Processing & Reporting) दर मागविण्याकरिता स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) क्रं.MHD/ १३/२०२१ रोजी दिनांक ०८/०१/२०२२ रोजी http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली होता. सदर वारस्य अभिव्यक्ती (EOI) प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात येत आहे.

मा.अतिरिक्त आयुक्त महोदय यांचे मान्यतेने,

**सही/-**
**(सचिन पवार)**
**उपायुक्त (आरोग्य)**
**पनवेल महानगरपालिका**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## कार्यकर्ता हा परिपक्व आणि पक्षाशी एकनिष्ठ असावा : आ.जयंत पाटील

चिटणीस तथा रायगड जिल्हा परिषद उपाध्यक्ष आस्वाद पाटील ( पप्पू शेठ), पनवेल महानगर पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम दादा म्हात्रे, महिला तालुका अध्यक्ष सीमा अनंत घरत, पनवेल तालुका चिटणीस, नगरसेवक गणेश कडू, सरपंच सुभाष भोईर, महाराष्ट्र राज्य क्रांतिकारी सेवा संघ अध्यक्ष नामदेवशेठ फडके, शेकापचे जेष्ठ नेते काका पाटील,माजी सभापती नरेश घरत, शेखर शेलके, माजी सभापती समिधा म्हात्रे, शेकाप गव्हाण विभाग अध्यक्ष मधुकर शेठ पाटील, माजी उपसभापती शुभांगी पाटील, तालुका चिटणीस मेघनाथ तांडेल, राजेश केणी, सरपंच संतोष घरत, सरपंच रंजना पाटील,माजी जिल्हा परिषद सदस्य चारुदत्त पाटील, जीवन गावंड, सुरेश पाटील, नरेंद्र मुंबईकर, माजी उपसभापती महादेव बंडा, उरण तालुका युवा अध्यक्ष रमाकांत म्हात्रे, नैना कमिटी अध्यक्ष वामन शेलके, प्रभाकर पाटील, भारतराज थळी, माजी सरपंच मधुकर शेठ पाटील, रमाकांत पाटील, नामदेव शेठ मुंबईकर, माजी चिटणीस यशवंत पाटील सह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून शेकापचे युवा तालूका अध्यक्ष रमाकांत म्हात्रे, महिला तालुका अध्यक्ष सीमा घरत, सुरेश पाटील, पनवेल तालुका चिटणीस गणेश कडू यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले.उरण तालुका शेकाप चिटणीस पदी विकास नाईक यांची निवड होताच उपस्थितांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.तसेच मावळते चिटणीस मेघनाथ तांडेल यांच्यावर पक्ष संघटना वेगळी जबाबदारी सोपविणार असल्याचे आमदार जयंत पाटील यांनी सांगितले.


अ‍ॅड.सुलक्षणा द. जगदाळे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१२५९/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०३/१२/२०२२

१) श्रीमती.सुशिला प्रल्हाद सावंत
वय : ६७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
पत्ता : फ्लॅट बी/४०३, विक्रम कॉम्प्लेक्स,
प्लॉट नं.०१, सेक्टर १०,
कामोठे पनवेल, रायगड ४१०२०६ अर्जदार

वरील अर्जदार श्रीमती.सुशिला प्रल्हाद सावंत, वय : ६७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी, पत्ता : फ्लट बी/४०३ विक्रम कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.०१, सेक्टर १०, कामोठे पनवेल, रायगड ४१०२०६ अर्जदार यांचे पती कै.प्रल्हाद आनंदा सावंत यांचे निधन दि.०८/११/२०१० रोजी रा.४०/१०२, मनिषा नगर कळवा, ठाणे येथे त्यांच्या राहत्या घरी झाले आहे. कै.प्रल्हाद आनंदा सावंत हे सेट्रल रेल्वे मुंबई येथे खलाशी या पदावर कार्यरत होते. अर्जदार या कै.प्रल्हाद आनंदा सावंत यांच्या पत्नी असून त्यांच्यापासून त्यांना श्री.राजेंद्र प्रल्हाद सावंत वय : ५० वर्षे हे एकमेव अपत्य आहे. कै.प्रल्हाद आनंदा सावंत यांच्या मृत्यूपश्चात (पत्नी) श्रीमती.सुशिला प्रल्हाद सावंत व (मुलगा) राजेंद्र प्रल्हाद सावंत हे कायदेशीर वारसदार असून त्यांच्या व्यतिरिक्त कोणीही वारसदार नाहीत.

सदरहू अर्ज कै.प्रल्हाद आनंदा सावंत यांच्या मृत्यूपश्चात वारस दाखला मिळणेसाठी करीत आहेत.

अर्जदार हे पेन्शन चौकशीसाठी कॅनरा बँक अकाऊंट सेक्शन ८ बे, दालमेल टॉवर ग्राऊंड फ्लोअर फ्री प्रेस जनरल रोड, नरीमन पॉईंट मुंबई ४०००२१ येथे गेले असता तेथील संबंधित अधिकाऱ्यांनी अर्जदार यांना कै.प्रल्हाद आनंदा सावंत यांचे वारसदार असल्याबाबतचा सक्सेशन सर्टीफिकेट आणणेसाठी तोंडी सांगितले आहे. तेव्हा सदरहू अर्जास कारण घडले आहे.

**पेन्शन देणाऱ्या बँकेची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे** :

| | |
|---|---|
| खातेदाराचे नाव | कै.प्रल्हाद आनंदा सावंत |
| बँकेचे नाव | कॅनरा बँक माझगाव शाखा |
| अकाऊंट नं | पी. ५१६४८ |
| पी.पी.ओ.नं. | ५०२०५/१०८२०३ |

सबब अर्जदार यांनी सदरचा वारसदाखला मिळणेबाबत अर्ज करीत आहे. सदरचा वारसदाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणीही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत त्या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारसदाखला देण्यात येईल व त्यामागून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१३/१०/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



Gunnal Judge
Adv.Aruna S. Nikam

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE SENIOR DIVISION PANVEL, AT-PANVEL
CIVIL M.A.29/2022
Exh No. 7/D
Next Date : 29/11/2022

Aditi singh through Tulika singh
Residing at 13-A, Tower-D,
Viceroy Park, Thakur Village,
Kandivali (e), Mumbai-400101 Applicant
Vs.
Tulika singh Ors. 2 Non Applicant

Where as Late. **MR.AMRITPAL BOLA SINGH** inhabitant of at Curson Avenue 1 E city Los Angles, stat-California-90036 died on 17 th june 2017 and where as **Aditi Singh** inhabitant of kandiwali (East) Mumbai has presented on application to the judge of senior division (S.D) Panvel for

**FLAT NO.1302, 13th FLOOR, A WING SHAH HEIGHTS, SECTOR 07, PLOT NO.22, KHARGHAR, TAL-PANVEL, DIST-RAIGAD VALUE OF RS. 85,09,290/-**

The purpose of Probate of said Late Mr.AMRITPAL BOLA SINGH, this is to give notice to all person who may dispute the right of the said **Aditi singh** as heir [executor or administrator as the case may be] of the said LATE MR.AMRITPAL BOLA SINGH, to appear in the court of the said **CIVIL JUDGE (S.D.) PANVEL** within one month from the date of this proclamation, there to enter their objections & it is hereby declared that if no sufficient objection is offered before expriration of that period, the said judge will foruthwith proceed to received proof of the said **LATE MR.AMRITPAL BOLA SINGH's** right to grant her provided she shall appear entitled thereto, a certificate of Probate (executorship or administratorship, as the cas may be) of the said LATE MR.AMRITPAL BOLA SINGH, deceased.

Date at this day of 12/10/22

Sd/- Clerk S.D.PANVEL — Court Seal — Sd/- Superitended C.J.S.D


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पेपर देण्यास गेलेली तरुणी घरी परतलीच नाही

**दै.रायगड नगरी । पनवेल**


केएलई कॉलेज येथे पेपर देऊन कोणास काही एक न सांगता एक तरुणी कोठेतरी निघून गेल्याने ती हरवल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

सिम्मी धनराज मौर्य (वय १९) रा. पेंधर गाव, रंग गोरा, बांधा मजबूत, चेहरा उभट, केस साधारण काळे, उंची अंदाजे ४ फूट ६ इंच आहे तसेच अंगात काळ्या रंगाची कुर्ती व काळ्या रंगाची लेगिन्स पॅन्ट, लाल रंगाची ओढणी, पायात काळ्या रंगाची सॅन्डल तसेच चष्मा परिधान केला आहे सोबत काळ्या रंगाचे दप्तर आहे या तरुणी बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास कळंबोली पोलीस ठाणे किंवा पो ना समर्थ वरखडे यांच्याशी संपर्क साधावा.

## सागरी गरुड प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

सागरी गरुड ( सी इगल ) ही प्रजाती मोठ्या प्रमाणात नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. समुद्रातील मासे हे त्यांचे मुख्य अन्न आहे. सर्रास समुद्र किनारी मोठ्या संख्येने हे गरुड पुर्वी दिसायचे आता यांच्या संख्येत कमालीची घट झाली आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात घट होत असल्याने या प्रजातीची रेड झोन मध्ये नोंद झाली आहे. तरी या प्रजातीला वाचविण्यासाठी काहीतरी उपाय योजना करुन संवर्धन करण्याची मागणी पक्षी प्रेमींनी केली आहे.



समुद्रकिनारी अवकाशात घिरट्या घालीत समुद्रातील माशांवर नजर ठेवून झेप घेऊन अचूक पणे टिपणारी ही प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. पुर्वी समुद्रकिनारी अवकाशात मोठ्या प्रमाणात घिरट्या घालत असताना दिसायचे पण आता एखादाच सागरी गरुड नजरेस पडत आहे. समुद्रकिनारी मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे, समुद्री जंगल नष्ट होत असल्याने या प्रजातीची आदिवास नष्ट होत असल्याचे पक्षी प्रेमींनी मनोगतात सांगितले आहे. पॅलासचे मासे गरुड, ज्याला पॅलासचे समुद्र गरुड किंवा बॅंड–टेलेड फिश ईगल असेही म्हण–तात, हा एक मोठा, तपकिरी सागरी गरुड आहे. कझाकस्तान, रशिया, ताजिकिस्तान, तुर्कमेनिस्तान, उझबेकिस्तान, मंगोलिया, चीन, भारत, नेपाळ, बांगलादेश, म्यानमार आणि भूतानमधील पूर्व पॅलेर्क्टिकमध्ये त्याची पैदास होते. ते खणउछ रेड लिस्टमध्ये संकटग्रस्त म्हणून सूचीबद्ध आहे.

## वाडी वस्त्यातील आदिवासी बांधव जगताहेत कष्टाचे जीवन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण रायगड जिल्ह्यात आदिवासी बांधव मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहेत. निरक्षरता, रोजगाराचा अभाव, परिणामी आर्थिक हलाखीची परिस्थिती, यामुळे येथील आदिवासी बांधव नैसर्गिक साधन संपत्तीवर अवलंबून असून ते जंगलातील कंदमुळे, रानभाज्या व मासेमारी या माध्यमातून आपली उपजीविका करतात. सध्या डोंगर उतारावरून, आलेले पाणी शेतातून वाहत आहे. या पाण्यात बऱ्यापैकी मच्छीचे प्रमाण असल्याने आदिवासी बांधव शेतातील मासेमारी करीत आहेत.



तर रात्रीच्या वेळी ओढ्या नाल्यातील पाण्यात गोड्या चिंबोऱ्यांचा वावर मोठ्या प्रमाणावर असल्याने ही आदिवासी मंडळी बॅटरीच्या उजेडाचा आधार घेत, मोठ्या मेहनतीने त्यांना पकडून आपली उपजिविका भागवितात. अलीकडे शेतमजुरीचे दर मोठ्या प्रमाणावर वाढल्याने, भात शेती लागवडीचे प्रमाण हे मोठ्या प्रमाणात कमी झाले आहे. त्यामुळे शेतीच्या हंगामात पूर्वीसारखी मिळणारी मजुरी या आदिवासींना आता मिळत नाही. त्यामुळे आदिवासी बांधवांना नैसर्गिक साधन संपत्तीवर अवलंबून राहावे लागत आहे. मात्र महागाईमुळे या नैसर्गिक साधन संपत्तीवर प्रपंच चालविणे त्यांना कठीण होत असल्याने, जिल्ह्यातील बऱ्याच ठिकाणचे आदिवासी बांधव पोटासाठी कामाच्या शोधात, घरदार वाऱ्यावर सोडून, मुलाबाळंसह आपल्या पोटाची खलगी भरण्यासाठी बाहेरगावी जात आहेत. जिल्ह्यातील अनेक ठिकाणच्या आदिवासी बांधवांची ही व्यथा आहे. परिणामी आदिवासी बांधव आपल्या मुलाबाळांना सोबत घेऊन, स्थलांतरित होत असल्याने, मुलांच्या शिक्षणाचा पुरता बट्ट्या घोळ उडतो.

लहान वयातच निरक्षरता या मुलांच्या माथी मारली जाते जिल्ह्या–तील बऱ्याच ठिकाणच्या आदिवासी बांधवांचे स्थलांतर हे वर्षानुवर्ष सुरु आहे. ते थांबविण्याचे शासनाचे प्रयत्न हा फक्त दिखाऊपणा आहे. याबाबतीत योग्य नियोजन आणि स्थानिक ठिकाणी कायमस्वरूपी रोजगार आणि योग्य मजुरी ही वेळेत त्यांना दिली, तरच स्थलांतर थांबेल त्यामुळे शासनाने त्यांना रोजगाराच्या संध्या उपलब्ध करून दिल्या, तर पुढील भावी पिढ्यांना हे असे कष्टाचे जीवन जगावे लागणार नाही.

## आदर्श शाळा मोठीजुई शाळेत विद्यार्थ्यांनी गडकिल्ले प्रदर्शन भरवून जागविला शिवरायांचा इतिहास

**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आदर्श मोठीजुई शाळेत दिवाळीपूर्वी गडकिल्ले उपक्रमाला सुरुवात झाली. शिवरायांचे वारसदार म्हणून त्यांनी निर्माण केलेल्या स्वराज्याची जबाबदारी म्हणून आपली गडकिल्ले संवर्धन काळाची गरज आहे ही भावना विद्यार्थ्यांच्या मनामनात बिंबविण्यासाठी मातीचे गडकिल्ले तयार करण्याची स्पर्धा सुरू करण्यात आली होती या मातीशी आपलं घट्ट नातं आहे हे आपल्या प्रात्यक्षिकातून दाखवून दिले. व आपल्या कृतीतून शिवरायांचा इतिहास जागृत करण्याचा प्रयत्न केला.

इयत्ता २ ते ७ वी पर्यंतच्या मुलांनी गटनिहाय सहभाग घेऊन स्वतःच्या संकल्पनेतुनच शिवरायांच्या स्वराज्यातील गडकिल्लयांच्या प्रतिकृती तयार केल्या. यामध्ये शिवनेरी, रायगड, प्रतापगड, सिंहगड, मुरुड जंजिरा, कर्नाळा, कोंढाणा इ.किल्ले मुलांनी तयार केले होते. या किल्लयांचे स्पर्धा प्रदर्शनाचे उदघाटन ग्रुप ग्रामपंचायत मोठीजुई सरपंच अश्विनी ताई भोईर यांनी केले. यावेळी पंचायत समिती उरण साधन व्यक्ती मनिषा पाटील, माजी सरपंच ललिता ताई पाटील, सदस्या तेजश्रीताई भोईर, सुरेखा ताई भोपी, शाळा व्यवस्थापण सदस्या रश्मी ताई भगत, गुलाबताई कोळी, प्रगती ताई कोळी, क्रांतीताई भोईर, सविताताई पाटील, शाळेचे मुख्याध्यापक संजय होळकर, शिक्षक दर्शन पाटील, संदीप गावंड, यतीन म्हात्रे, श्रीम.ज्योती बामणकर, काजल पाटील उपस्थित होते.



## रिक्षा पायावरून नेऊन केली गंभीर दुखापत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका इसमाच्या डाव्या पायास रिक्षाची ठोकर बसून झालेल्या अपघातात गंभीर दुखापत झाल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

विश्वास ठाणगे (वय ५०) यांचा वडापाव विक्रीचा व्यवसाय असून त्यांच्या लाईन आळी पनवेल येथील वडापावच्या गाळ्यासमोर एका इसमाची ऑटो रिक्षाचे चाक पंचर होऊन बंद पडल्याने सदरची रिक्षा ढकलून बाजूला घेत असताना अचानकपणे पाठीमागून आलेल्या भरधाव वेगातील रिक्षाने त्यांच्या डाव्या पायास जोरदार ठोकर मारली. पायावरून रिक्षा चाक गेल्याने त्यांच्या पायास गंभीर दुखापत झाली आहे. या घटनेनंतर सदर रिक्षा चालक रिक्षासह पसार झाल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे

---

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) साहेब यांचे न्यायालयात, उरण

दि.चौ.अर्ज क्र.२२३/२०२७
नि.नं.३४/ड

१) सौ.जयवंती गजानन म्हात्रे
२) श्री.सुरेश गजानन म्हात्रे
३) अनिता गजानन म्हात्रे
४) श्री.भुवन गजानन म्हात्रे
सर्व रा.नवीन शेवे, ता.उरण,
जि.रायगड, पिन क्र.४००७०२ — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै. गजानन बामा म्हात्रे, रा.नवीन शेवे, ता.उरण, कै.गजानन बामा म्हात्रे यांचे दि.१०/०३/१९९६ रोजी राहत्या घरी शेवे येथे निधन झाले आहेत. कै.गजानन बामा म्हात्रे यांचे सहमालकीची व ताबेकब्जे वहिवाटीतील शेतजमीन मिळकत खालील वर्णन केलेल्या मे.न्यायालयाच्या स्थळसिमेत आहेत.

**(मौजे : शेवे, ता.उरण, जि.रायगड)**

| युनिट केस क्र. | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| शेवे/२३१ I | १९१ | ४ | ०-१३-० |
| | ३६ | १६ | ०-६-० |
| | ४ | १ | ०-३-० |
| | ३६ | १७ | ०-५-० |
| शेवे/२३१ II | १९२ | ८ | ०-१-० |
| शेवे/२३१ III | ११ | ३१ A | ०-११-० |
| | १६ | ३ | ०-३-० |
| | २० | ८ | ०-३-८ |
| | २३ | ३ | ०-६-२ |
| | ३१ | १३ B | ०-५-० |
| | १६९ | १३ A | ०-९-० |
| | १७२ | ११ | ०-७-८ |
| | १७३ | ११ | ०-१५-५ |
| | १७७ | ५ | ०-३-३ |
| | १८३ | ५ | ०-१-८ |
| | १८९ | १३ | ०-८-० |
| | १९३ | ५ | ०-१-० |
| ४२/शेवे | १७ | ३५ | ०-२६-० |
| २३०/शेवे | १७७ | ९ | ०-२-० |
| २३२/शेवे | १८१ | ९ | ०-८-८ |

वरील मिळकतीच्या कै.गजानन बामा म्हात्रे यांच्या सहमालकी हक्काच्या असून यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार मिळण्यास पात्र आहेत. वर वर्णन केलेल्या शेतजमीन मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत आत लेखी अथवा तोंडी हरकती योग्य त्या कागदोपत्री पुराव्यास मे.न्यायालयात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकती दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून, पुरावा घेवून मे.न्यायालयात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान केले जाईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

आज दि.१४/१०/२०२२ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयात यांचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, उरण** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, उरण**

---

मे.गोडसे मॅडम कोर्ट
ॲड.अनिरुद्ध गो.तुळसणकर, पनवेल
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१४४७/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.३०/११/२०२२

१) श्रीमती.अश्विनी आशुतोष दिघे
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कुमारी श्रावणी आशुतोष दिघे
वय : १८ वर्षे, धंदा : शिक्षण
३) कुमारी पुर्वा आशुतोष दिघे
वय : १४ वर्षे, धंदा : शिक्षण
क्रं.१ स्वतःकरिता व क्रं.३ चे अज्ञान पालन
करणार आई म्हणून
क्र.१ ते ३ रा.फ्लॅट नं.१०६/१०७, साई स्पर्श
बिल्डींग, साई मंदिर समोर, अंबानी हॉस्पिटल
जवळ, लोधिवली, खालापूर, जि.रायगड
४) श्रीमती.सुमन अनिल दिघे
वय : ८२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.बी.५, हर्षनिती बिल्डींग, प्लॉट नं.११२/३,
रॉयल कॉस्मो हेल्थ क्लब जवळ,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
सध्या रा.फ्लॅट नं.१०६/१०७, साई स्पर्श
बिल्डींग, साई मंदिर समोर, अंबानी हॉस्पिटल
जवळ, लोधिवली, खालापूर, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्रं.१ यांचे पती व अर्जदार क्रं.२ व ३ यांचे वडील आणि अर्जदार क्रं.४ यांचा मुलगा कै.आशुतोष अनिल दिघे यांचे निधन नानावटी हॉस्पिटल, मुंबई येथे दि.१६/०५/२०२१ रोजी झाले आहे. कै.आशुतोष अनिल दिघे यांना हिंदू वारसा कायद्याप्रमाणे अर्जदार क्रं.१ ही विधवा पत्नी व अर्जदार क्रं.२ व ३ या मुली आणि अर्जदार क्रं.४ ही आई असे कायदेशीर वारस आहेत.

कै.आशुतोष अनिल दिघे यांच्या नावे असलेल्या स्थावर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

| | |
|---|---|
| अ) | मौजे : लोधिवली, ता.खालापूर, जि.रायगड येथील सर्व्हे नं.३७ ब, भूखंड क्रं.१ वर बांधण्यात आलेल्या साई स्पर्श को.ऑप.हौ. सोसायटी या इमारतीचे पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका क्रं.१०६, क्षेत्र ४१५ चौरस फुट कारपेट अशा वर्णनाची निवासी सदनिका. |
| ब) | मौजे : लोधिवली, ता.खालापूर, जि.रायगड येथील सर्व्हे नं.३७ ब, भूखंड क्रं.१ वर बांधण्यात आलेल्या साई स्पर्श को.ऑप.हौ. सोसायटी या इमारतीचे पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका क्रं.१०७, क्षेत्र ४१५ चौरस फुट कारपेट अशा वर्णनाची निवासी सदनिका. |
| क) | मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील अंतिम भूखंड क्रं.११२, सब प्लॉट नं.३ वर बांधण्यात आलेल्या हर्षनिती को.ऑप.हौ.सोसायटी या इमारतीचे बी विंग मधील पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका क्रं.बी–५, क्षेत्र ३७८ चौरस फुट कारपेट अशा वर्णनाची निवासी सदनिका. |

सदरील परिच्छेद २ अ व २ ब कडील मिळकतीमध्ये कै.आशुतोष अनिल दिघे यांचा निम्मा म्हणजेच ५० टक्के हिस्सा आहे.

वर श्रीमती.अश्विनी आशुतोष दिघे वगैरे हे कै.आशुतोष अनिल दिघे यांचे कायदेशीर वारस आहेत या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष जर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालवधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.अश्विनी आशुतोष दिघे वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.आशुतोष अनिल दिघे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१४/१०/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

अर्जदाराचे वकील : ॲड.विपुल रमाकांत ठाकूर

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१७८/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२८/११/२०२२

१) श्री.बाळकृष्ण प्रभाकर पाटील
वय : ५९ वर्षे, धंदा : निवृत्त
२) श्रीमती.वैशाली कृष्णा पाटील
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
वरील १ व २ रा.पागोटे, ता.उरण, जि.रायगड ४००७०७
३) श्रीमती.सुरेखा श्याम गोवारी
वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड ४१०२०६
४) श्रीमती.कलावती नियंता भेपी
वय : ३९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मोठी जुई, ता.उरण, जि.रायगड ४००७०२ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.प्रभाकर हरी पाटील यांचे दि.०७/१०/२०१८ रोजी मौजे : उरण–पागोटे, ता.उरण, जि.रायगड येथे राहत्या घरी निधन झाले आहे. अर्जदार हे कै.प्रभाकर हरी पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत. कै. प्रभाकर हरी पाटील यांच्या सामाईक नावे असलेली खालील वर्णनाची मिळकत महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई प्रकल्पाकरिता भूसंपादीत केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | गावाचे नाव व युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे : नवघर ५३/८५ | ३४९ | ३ | ०-३-८ |
| २ | | ३४९ | ११ | ०-९-० |
| ३ | | ३४९ | १३ | ०-०-४ |
| ४ | | १८५ | ७ | ०-७-१२ |
| ५ | मौजे : पागोटे २८८ I/८५-८६ | ५८ | ८ | ०-५-१२ |
| ६ | | ६४ | ३ A | ०-१३-० |
| ७ | | ३४ | १ | ०-१४-१२ |
| ८ | | ४७ | ७ | ०-२-४ |
| ९ | | ११० | ५ | ०-७-८ |
| १० | | ८१ | ४ | ०-११-१२ |
| ११ | | ८५ | १ | ०-१३-८ |
| १२ | | २७ | ३ | ०-७-० |
| १३ | | ३२ | २ | ०-७-८ |
| १४ | | ८७ | ८ | ०-१२-० |
| १५ | | २५ | ४ | ०-५-१२ |
| १६ | मौजे : पागोटे २८८ II/८५-८६ | ९३ | ७ | ०-१७-० |
| १७ | मौजे : पागोटे २८८ III/८५-८६ | ८ | २+३ | ०-५-० |
| १८ | | ९ | ५ | ०-४-१२ |

वरील मिळकतीमध्ये वर दिलेले अर्जदार क्र.१ ते ४ हे कै. प्रभाकर हरी पाटील यांचे वारस असून त्यास आणखी कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी आपणास सदर कामी वारस असल्यचा दाखला मिळावा म्हणून ना.कोर्टात प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. तरी अर्जदार यांच्या वारस असल्याच्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकत द्यायची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर वकीलांमार्फत न्यायालयात हरकत न घेतल्यास ना.कोर्ट तत्संबंधी योग्य पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.११/१०/२०२२ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, उरण** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, उरण**

---

अर्जदाराचे वकील : ॲड.विपुल रमाकांत ठाकूर

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१७२/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२८/११/२०२२

१) श्रीमती.अलका हरिश्चंद्र पाटील
वयः ४८ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.परेश हरिश्चंद्र पाटील
वय : २६ वर्षे, धंदा :
३) कु.नितिकेश हरिश्चंद्र पाटील
वय : २३ वर्षे, धंदा :
४) कु.सोनाली हरिश्चंद्र पाटील
वय : २९ वर्षे, धंदा :
वरील सर्व रा.मु.कुंडेगाव
ता.उरण, जि.रायगड ४००७०७ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.हरिश्चंद्र कमळ्या पाटील यांचे दि.१५/०१/२०१९ रोजी मौजे : कुंडेगाव, ता.उरण, जि.रायगड येथे राहत्या घरी निधन झाले आहे. अर्जदार हे कै.हरिश्चंद्र कमळ्या पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत. कै.हरिश्चंद्र कमळ्या पाटील यांच्या सामाईक नावे असलेली खालील वर्णनाची मिळकत महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई प्रकल्पाकरिता भूसंपादीत केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | गावाचे नाव व युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे : नवघर ५३/८५ | ३४९ | ३ | ०-३-८ |
| २ | | ३४९ | ११ | ०-९-० |
| ३ | | ३४९ | १३ | ०-०-४ |
| ४ | | १८५ | ७ | ०-७-१२ |
| ५ | मौजे–नवघर २०४/८५ | १६३ | १३ | ०-३-१२ |
| ६ | मौजे : नवघर ३०५ | १५९ | १० | ०-८-४ |
| ७ | मौजे : नवघर २१६ | १५७ | ३ | ०-८-१२ |
| ८ | मौजे : नवघर ५२/८५ | १४९ | ६ | ०-५-० |
| ९ | | १५० | ७ | ०-५-४ |
| १० | | १५२ | ५ अ | ०-३-८ |
| ११ | | १५२ | ९ | ०-१२-४ |
| १२ | | १५३ | ११ | ०-१०-८ |
| १३ | | १५३ | १३ | ०-११-० |
| १४ | | १५५ | २ | ०-१२-१५ |
| १५ | | १५६ | २ | ०-८-४ |
| १६ | | १५७ | २ | ०-७-१२ |
| १७ | | १५७ | ९ | ०-८-० |
| १८ | | १५८ | ९ | ०-५-१२ |
| १९ | | १५८ | ११ | ०-६-८ |
| २० | | १६० | ९ | ०-४-१२ |
| २१ | | १६० | १३ | ०-५-८ |
| २२ | | १६५ | २ | ०-३-८ |
| २३ | | ३११ | ९ | ०-४-८ |
| २४ | | ३२० | ६ | ०-२२-० |
| २५ | | ३४३ | ११ | ०-४-४ |
| २६ | | ३५२ | ४ | ०-१४-४ |
| २७ | | ३२६ | २ | ०-१३-० |
| २८ | | ३२६ | ५ | ०-११-१२ |
| २९ | | ३४१ | ८ अ | ०-४-० |
| ३० | | १५५ | ६ अ | ०-३-० |
| ३१ | | १६१ | ७ | ०-२-४ |
| ३२ | मौजे : पागोटे २८८ I/८५-८६ | ५८ | ८ | ०-५-१२ |
| ३३ | | ६४ | ३ अ | ०-१३-० |
| ३४ | | ३४ | १ | ०-१४-१२ |
| ३५ | | ४७ | ७ | ०-२-४ |
| ३६ | | ११० | ५ | ०-७-८ |
| ३७ | | ८१ | ४ | ०-११-१२ |
| ३८ | | ८५ | १ | ०-१३-८ |
| ३९ | | २७ | ३ | ०-७-० |
| ४० | | ३२ | २ | ०-७-८ |
| ४१ | | ८७ | ८ | ०-१२-० |
| ४२ | | २५ | ४ | ०-५-१२ |
| ४३ | मौजे : पागोटे २८८ II/८५-८६ | ९३ | ७ | ०-१७-० |
| ४४ | मौजे : पागोटे २८८ III/८५-८६ | ८ | २+३ | ०-५-० |
| ४५ | | ९ | ५ | ०-४-१२ |

वरील मिळकतीमध्ये वर दिलेले अर्जदार क्र.१ ते ४ हे कै.हरिश्चंद्र कमळ्या पाटील यांचे वारस असून त्यास आणखी कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी आपणास सदर कामी वारस असल्यचा दाखला मिळावा म्हणून ना.कोर्टात प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. तरी अर्जदार यांच्या वारस असल्याच्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकत द्यायची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर वकीलांमार्फत न्यायालयात हरकत न घेतल्यास ना.कोर्ट तत्संबंधी योग्य पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.११/१०/२०२२ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, उरण** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, उरण**

# संक्षिप्त...

## पनवेलमधून इसम बेपत्ता

**दै.रायगड नगरी । उरण**

राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता कोठे तरी एक इसम निघून गेल्याने तो हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

सुरेश बाबुराव शेळके (३२) रा. काळुंद्रे गाव, उंची पाच फूट सात इंच, मध्यम बांधा, सावळा वर्ण, चेहरा उभट, डोळे काळे, नाक सरळ, फ्रेंच दाढी कट असून अंगात चॉकलेटी रंगाचा फुल शर्ट व काळ्या रंगाची फुल पॅन्ट तसेच पायात काळ्या रंगाचे पावसाळी बूट घातले आहेत. त्याला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. या इसमा बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे फोन नंबर – ०२२–२७४५२३३३ किंवा पो.हवा. एस . जी. जवरे यांच्याशी संपर्क साधावा.

## जात पडताळणीसाठी दोन वेळा काऊंटर चालू करून नागरिकांना दिलासा द्यावा : विश्वास पेटकर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जात पडताळणी संबंधी सर्व पेपर्स जमा करण्यासाठी पनवेलमध्ये प्रत्येक महिन्याच्या दोन वेळा काऊंटर चालू करून नागरीकांचा होणारा त्रास कमी करण्याबाबतचे निवेदन शिवसेना पनवेल तालुका प्रमुख विश्वास पेटकर यांनी जात पडताळणी विभागाला दिले आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, जात पडताळणी संबंधी कागदपत्रे जमा करण्याकरीता अलिबागमध्ये जाणे–येणे प्रत्येक विदयार्थ्याला व पालकांना खुप त्रासदायक होत असून आर्थिक भुर्दंड सुध्दा होतो. त्यातच एखादा पेपर्स कमी असल्यास त्या पालकांना किंवा विदयार्थ्यांना परत जाणे–येणे त्रासदायक होते. सार्वजनिक बांधकाम ऑफिस (पनवेल), जिल्हा न्यायालयाचे ऑफिस (पनवेल), उपजिल्हा रुग्णालय (पनवेल) हि सर्व कार्यलये पनवेलमध्येच आहेत. पनवेल हे उरण, कर्जत व पनवेल तालुक्यातील गावांसाठी जवळचे ठिकाण असून आमच्या या निवेदनाची आपण जाणीवपूर्वक दखल घेऊन जातपडताळणीचे अर्ज जमा करण्यासाठी पनवेलमध्ये कांउटर (खिडकी) उघडावी अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# पेण येथे शिवसेनेची भव्य मशाल रॅली : नागरिकांचा स्वयंस्फूर्तीने उत्स्फूर्त सहभाग

**दै.रायगड नगरी । पेण**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला निवडणूक आयोगाने मशाल निशाणी दिल्याने पेण तालुक्यातील शिवसैनिकांनी शहरांमध्ये मशाल रॅली काढून जल्लोष साजरा केला. या रॅलीत पेणच्या नागरिक स्वयंस्फूर्तीने सहभागी झाले होते.

अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला मशाल निशाणी दिली आहे. सदरची निशाणी सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्याकरिता पेण तालुक्यातील शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी व शिवसैनिकांनी रॅलीचे आयोजन केले होते.

उद्धव साहेब तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है, शिवसेना जिंदाबाद, आपली निशाणी मशाल, अरे येऊन येऊन येणार कोण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाशिवाय आहेच कोण, ५० खोके एकदम ओके अशा घोषणा देत पेण शहरातील मुख्य रस्त्यांवरून मशाल रॅली काढण्यात आली या मशाल रॅलीची सांगता छत्रपती शिवाजी महाराज



चौकात करण्यात आली. यावेळी बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

आगामी निवडणुकांमध्ये बाप चोरणाऱ्यांना व पक्षाची निशाणी गोठवणाऱ्यांना जनता त्यांची जागा दाखवून देईल. अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा विजय निश्चित आहे शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे व उद्धव ठाकरे यांचे कार्य महाराष्ट्राच्या जनमानसाच्या मनामनात आहे. हे जनता गद्दारांना आगामी निवडणुकीत घरचा रस्ता दाखवेल अशा विश्वास शिवसेनेचे रायगड जिल्हा सहसंपर्कप्रमुख किशोर जैन यांनी यावेळी व्यक्त केला. शिवसैनीकांनी मशाल चिन्ह सर्वसामान्य पर्यंत पोहोचवा. शिवसेनेला अधिक बळकट करण्यासाठी सर्वांनी तन–मन–धनाने कामाला लागा. ५० खोके घेणाऱ्या गद्दारांचा नायनाट करण्याचा निर्धार शिवसैनिकांनीकेला आहे असे प्रतिपादन शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख विष्णू पाटील यांनी या वेळी केले. या वेळी

शिवसेनेचे रायगड जिल्हा सहसंपर्कप्रमुख किशोर जैन, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख दीपश्री पोटफोडे, उपजिल्हाप्रमुख अविनाश म्हात्रे, शिवसेनेचे जिल्हा समन्वयक नरेश गावंड, तालुकाप्रमुख जगदीश ठाकुर, युवासेना पेण तालुका अधिकारी राकेश मोकल, शहर प्रमुख संजय पाटील, माजी शहर प्रमुख प्रदीप वर्तक, उपतालुकाप्रमुख हिराजी चोगले,, संतोष पाटील, जयराज तांडेल, जिते विभाग प्रमुख राजू पाटील, अवजड वाहतूक सेनेचे श्रीतेज कदम, दिलीप पाटील, वाहतूक सेनेचे जिल्हाप्रमुख अच्युत पाटील, ग्राहक संरक्षणचे नंदू मोकल, नरेश सोनवणे, तुकाराम म्हात्रे, गजानन मोकल, प्रसाद देशमुख, चेतन मोकल, सुधाकर म्हात्रे, विजय पाटील, शिवाजी म्हात्रे, दर्शना जवके यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## वाफेघर वस्तीची एसटी बस बंद



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यातील वाफेघर गावातील वस्तीला असणारी असणारी सकाळी पालीला जाणारी एसटी बस बंद करण्यात आली आहे. त्यामुळे सकाळी शाळा व महाविद्यालयात जाणारे विद्यार्थी तसेच कामाला जाणारे कामगार, दूधवाले आदी छोटे व्यावसायिक यांची गैरसोय होत आहे. ही वस्तीची एसटी सुरू करण्यासाठी ग्रामस्थांनी वाहतूक परिवहन महामंडळाकडे अर्ज केला आहे. मात्र अजूनही कोणतीच दखल घेतली गेलेली नाही.

या बसमुळे आजूबाजूच्या गावांतील विद्यार्थी व ग्रामस्थांची देखील सोय होत होती. मात्र बस बंद केल्याने त्यांना पदरमोड करत खाजगी वाहनाने पालीला यावे लागत आहे. काही विद्यार्थी व ग्रामस्थ तर पायी चालत येतात. त्यामुळे त्यांना हकनाक त्रास सहन करावा लागत आहे. काही लोकांचा रोजगार सुद्धा बुडत आहे. ग्रामस्थांनी एसटी बस सुरू करण्यासाठी पाली परिवहन मंडळाकडे पत्रव्यवहार केला. परंतु एसटी बस उपलब्ध नसल्याचे कारण तेथून देण्यात आले आहे.

## हरियाणाच्या मंत्र्यांची गव्हाण व तरघर ग्रामपंचायतीला भेट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

हरियाणा राज्याचे ग्रामविकास व पंचायत मंत्री देवेंदर सिंग बबली यांनी अभ्यास दौऱ्यांतर्गत गव्हाण व तरघर ग्रामपंचायतीला भेट देऊन कामकाजाचा आढावा घेतला. तसेच कॉमन सर्विस सेंटरची पाहणी केली. यावेळी त्यांच्या हस्ते आयुष्यमान भारत या योजनेचे कार्ड लाभ्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. त्यानी तरघर ग्रामपंचायत कार्यालय, आपले सरकार सेवा केंद्र मार्फत दिले जाणारे दाखल्याबाबत माहिती घेतली. ग्रामपंचायत तरघर हद्दीतील मौजे मोहा येथे घनकचरा प्रकल्पाची पाहणी केली. व रायगड जिल्हा परिषद शाळा मोहा येथे भेट दिली.




हरियाणा राज्याचे ग्रामविकास व पंचायत मंत्री देवेंदर सिंग बबली यांनी हे महाराष्ट्राच्या अभ्यास दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यांतर्गत त्यांनी पनवेल तालुक्यातील गव्हाण व तरघर ग्रामपंचायतीला भेट दिली. या वेळी त्यांनी उपस्थितांना ग्रामपंचायतीचा कारभार कसा चाल–तो, वार्षिक उत्पन्न किती आहे, वार्षिक उत्पन्नातून कर किती मिळतो, त्या करा मधून कोणकोणती विकास कामे करण्यात आली आहेत यांची माहिती घेतली.

तसेच आयुष्यमान भारत योजनेच्या लाभार्थ्यांना कार्डचे वाटप करून त्यांच्याशी संवाद साधला. या वेळी हरियाणा राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे अतिरीक्त मुख्य सचिव अनिल मलिक, माहिती व तंत्रज्ञान विभागाचे सहाय्यक अभियंता विनस नथालीया, अशिष शर्मा, राम प्रताप, वैभव देशपांडे, शिल्पा गणेगावकर, स्वप्नील चव्हाण, समशेर खान, संदिप साळुखे, पवनकुमार पांडे, संतकुमार स्वामी, भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुण भगत, पनवेल पंचायत समितीच्या सदस्य रत्नप्रभा घरत, उद्योजक जे. एम. म्हात्रे, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, बीडीओ संजय भोये, ग्रामसेवक विजयकुमार राठोड, ग्रामसेविका पवित्रा हटले, जयेश म्हात्रे, एम. डी. पाटील यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## बहाद्दर पोलिसांवर तळा तालुक्यातून होतोय अभिनंदनाचा वर्षाव


**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यात महिलांमध्ये चोरीची दहशत निर्माण करणाऱ्या अज्ञात चोरट्याला पकडण्यात तळा पोलिसांना यश आले असून पोलिसांचे कौतुक व अभिनंदन केले आहे या बाबतची मिळालेल्या माहितीनुसार अज्ञात चोरटा गेले सहा महिन्यापेक्षा अधिक काळ शहरातसह ग्रामीण भागात दहशत बसली होती मुली, महिलांचा विनयभंग, अंगावरील दाग दागिने चोरी करून दहशत झाली होती या बाबत तक्रारी झाल्या होत्या तक्रारीत दिलेल्या वर्णना नुसार पोलीस त्यांच्या मागावर होते.



याबाबत पोलिस निरीक्षक गोविंद ओमासे यांनी सहापो.निरीक्षक शिवराज खराडे, संजय शिंदे, सुरेश पवार यांचे पथक नेमले होते. तसेच अलिबाग क्राईम ब्रॅच कडे तपास होता. १२–१०–२०२२ रोजी पोलीस निरीक्षक शिवराज खराडे पोलीस हवालदार सुरेश पवार व संजय शिंदे आरोपींचा शोध घेत असता तळा मांदाड रोड वर काळेबेरे पोल्ट्री फार्म जवळ अज्ञात आरोपी तळा बाजूकडून त्याच्या ताब्यातील मोटार सायकल वर संशयीत रित्या जात असता आढळून आला असता पाठलाग करून अडवून फिल्मी स्टाईलने पकडून पोलीस ठाण्यात चौकशी करता ताब्यात घेतले असता वरील गुन्ह्याची कबूली दिली व यापूर्वी देखील केलेल्या गुन्ह्याची कबुली दिली असून म्हसळा तालुक्यातील बनोटी गावातील निलेश हरिश्चंद्र कांबळे वय ३४ अशी माहिती दिली. सदरची कामगिरी रायगड पोलीस अधीक्षक मा. अशोक दुधे अप्पर पोलीस अधिकारी अतुल झेंडे व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीण पाटील तळा पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक गोविंद ओमासे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस इन्स्पेक्टर धनाजी साठे पोलीस हवालदार चव्हाण अक्षय जाधव पो. ना.खराडे पोलीस कॉ. सावंत यांनी केली आहे. या पोलिस अधिकारी, कर्मचारी यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीने नागरिकांनी दहशत मुक्त झाले असल्याने तालुक्यातील नागरिकांकडून पोलिसाचे अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

## रास्त भाव धान्य वितरण करणारा टेम्पो ट्रक पलटी



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड शासकीय धान्य गोडावून मधून रास्त भाव धान्य दुकानदारांना धान्य वितरित करुन परतत असताना या रिकाम्या टेंपो ट्रकला मुरुड ताराबंदर गावानजीक अचानक मध्येच उभ्या असलेल्या रिक्षाला पाहून या टेंपोच्या चालकाने ब्रेक मारला परंतु पाऊस पडत असल्याने रस्ता ओला झाला होता त्यामुळे हा टेंपो घसरुन रस्त्याच्या कडेला जाऊन पलटी झाला.

या टेंपो मध्ये चालक व दोन मजूर होते सुदैवाने कोणालाही मार लागला नाही व सर्वजण सुखरूप असल्याचे समजते. हा टेंपो बोर्ली येथिल रास्त भाव धान्य दुकानदारांना धान्य वितरण करुन परतत असताना हा अपघात झाला. या टेंपोत धान्य नसल्याने मोठा अपघात होता होता टळला आहे.

## परतीच्या पावसाने शेतकरी हवालदिल ; भातशेतीचे नुकसान

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यात आज दुपारी ३ ते रात्री ८ वाजेपर्यंत मेघगर्जनेसह पाऊस छान पडला. तालुक्याचे सरासरी पर्जन्यमान ३६०० मि.मि. असून आजपर्यंत ३२०० मि.मि. पाऊस झाला आहे. यापुढेही तीन ते चार दिवस अशाच स्वरुपाचे हवामान, पाऊस रहाणार आहे असा आंदाज आहे.

हवामान खात्याने हा पाऊस परतीचा आसल्याचा अंदाज वर्तविला आहे. तालुक्याचे खारगांव, तोंडसुरे, आगारवाडा, मेंदडी गोडघर व अन्य काही भागात हळवी भात पिक कापणी साठी तयार आहेत, पाऊस लांबणीवर गेल्यास शेतकऱ्यांची मेहनत फुकट जाण्याची भिती वाटत आहे. तालुक्यात भात पिका खालील क्षेत्र २४०० हेक्टर व नाचणीचे क्षेत्र ४०० हेक्टर आहे. वरी, तीळ, उडीद अशी अन्य पिकेही तालुक्यात थोडया प्रमाणात घेतली जातात. सातत्याने बदलणाऱ्या हवामानामुळे होणाऱ्या नुकसानीमुळे पूर्वी ३१०० हेक्टर मध्ये घेत असलेले भात पिक २४०० हेक्टर, आज मितिला तर तालुक्यातील अनेक गावातून हवामानाचा लहरीपणा, अपुरा शेतमजूर, महाग झालेले सुधारीत बियाणे, खते, औषधांच्या वाढत्या किमती मुळे सर्वसामान्य शेतकऱ्याना शेती–बागायती आर्थिक दृष्ट्या परवडत नसल्याचे चित्र आहे परतीच्या पावसाने तालुक्यात धुमाकूळ घातला असल्याने तयार भातपीक धोक्यात आले आहे. परतीच्या पावसामुळे भात पिकाचे नुकसान होत आहे. पिण्याच्या पाण्याची भीषणता निर्माण होऊ नये, यासाठी पाऊस आवश्यक असला तरी तयार भातपिकास मारक ठरत आहे. हळवे भात तयार झाले असून, पाऊस थांबल्यास शेतकरी ८–१० दिवसांत कापणीस सुरवात करतील, सलग लागत असलेल्या पावसामुळे तयार भातपिकाचे नुकसान होण्याचा संभव आहे.



## पनवेल, कळंबोली, कामोठेमध्ये शिवसैनिकांनी मारुतीरायाच्या साक्षीने केले मशालचे स्वागत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेनेला धगधगती मशाल हे चिन्ह मिळताच शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली पनवेल विधानसभा मतदार संघातील पनवेल शहर, कळंबोली शहर, कामोठे शहर येथे शिवसैनिकांनी जल्लोष करत मारुतीरायाची साक्षीने पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे साहेब यांचा जयघोष करत मशालीचे स्वागत केले.

केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेनेचे धनुष्यबाण हे मुळ चिन्ह गोठवल्यानंतर अंधेरी पोटनिवडणुकी साठी शिवसेनेला मशाल हे चिन्ह दिले आहे. पनवेल विधानसभा मतदार संघातील पनवेल शहर, कळंबोली शहर, कामोठे शहर येथे शिवसैनिकांनी जल्लोष करत मारुतीरायाची साक्षीने चिन्हाचे स्वागत केले आहे. यावेळी शिवसेना जिल्हासल्लागार शिरीष बुटाला, महानगर



समन्वयक दिपक घरत, पनवेल शहर प्रमुख प्रवीण जाधव, कामोठे शहर प्रमुख राकेश गोवारी, पनवेल मा. नगरसेवक विश्वास म्हात्रे, पनवेल उपशहर प्रमुख अबरार मास्टर, सुजान मुसलोंडकर, उपशहर प्रमुख कामोठे भरत शिंदे, उमेश खेडेकर, सचिन त्रिमुखे, दिपक पाटील, पनवेल विभाग प्रमुख अमित माळी, प्रदीप माखेजा, जुनेद पवार, नूर वाईकर, यतीन मानकामे, किशोर सावंत, कामोठे विभाग प्रमुख नितिन भेंडरे, कळंबोली शहर संघटक अक्षय साळुंखे, कळंबोली शहर संघटक अरविंद कडव, कामोठे शहर संघटक संतोष गोळे, कळंबोली उपशहर प्रमुख सूर्यकांत म्हसकर, विभाग प्रमुख महेश गुरव, युवासेना विधानसभा अधिकारी पराग मोहिते, महिला आघाडी कळंबोली शहर संपर्क संघटिका सौ. रत्नमाला शिंदे, पनवेल शहर संघटिका सौ. अर्चना कुळकर्णी, कळंबोली शहर संघटिका सौ. ज्योति मोहिते, कामोठे शहर संघटिका सौ. संगीता राऊत आदि शिवसैनिक तथा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उरण विधानसभा मतदारसंघात भाजपला खिंडार ; शिवसेनेत मोठे इनकमिंग

### पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**दै.रायगड नगरी । उरण**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून त्यांच्या प्रमुख उपस्थितीत उरण विधानसभा मतदारसंघात पनवेल तालुक्यातील भोकरपाडा, पोयांजे व कोन विभागातील भाजप च्या शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख बबनदादा पाटील, जिल्हाप्रमुख माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली मातोश्रीवर झालेल्या या प्रवेशात सतिश अगिवले, लक्ष्मण पाटील, अरविंद शिंदे, उमेश शिंदे, मयुर पाटील, धीरज पाटील, रघुनाथ पाटील, हेमंत पाटील, हेमंत शिंदे, अनिल मोरे, विनोद शिंदे, हेमंत पी.पाटील, सागर अगिवले, संतोष अगिवले, संतोष पाटील, संतोष सी. पाटील, महेश पाटील, दिपक पाटील, आदेश पाटील, रोहित पाटील, पवन पाटील, साहिल पाटील, प्रतिक पाटील, अनंत ससे, सुशांत मालकर, रोशन म्हात्रे व कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

यावेळी उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर, विधानसभा संपर्कप्रमुख महादेव घरत, विधानसभा संघटक देविदास पाटील, उरण तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, पनवेल तालुकाप्रमुख रघुनाथ पाटील, तालुका संघटक बी एन डाकी, गटनेते गणेश शिंदे, तालुका संपर्कप्रमुख अनंत पाटील व उरण विधानसभा मतदारसंघातील सर्व आजी–माजी पदाधिकारी, महिला आघाडी पदाधिकारी, युवसेना पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

